महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट राज्य, मुंबई.
कार्यालय महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, व्यवस्थापकीय संचालक
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता: डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर-४४००२२
दूरध्वनी क्र.०७१२-२९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL184705 ई-मेल : mahajyotingp@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/२५७० /२०२३-२४ दिनांक- २७/११/२०२३

# परिपत्रक

**विषय : महाज्योती मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग- राज्यसेवा (MPSC) परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी उमेदवारांची प्रारूप निवड यादी**

महाज्योती मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग- राज्यसेवा (MPSC) द्वारा आयोजित होणाऱ्या परीक्षेचे प्रशिक्षण देण्याकरिता उमेदवारांची निवड करण्यासाठी चाळणी परीक्षेचे आयोजन दिनांक २५ व २६ ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आलेले होते. या परीक्षेचा प्रारूप निकाल बैठक क्रमांकानुसार दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी जाहीर करण्यात आला. प्रारूप निकालावर आक्षेप मागून आक्षेपकर्त्यांना परीक्षा यंत्रणेद्वारे उत्तरे देण्यात आलेली आहेत. सदर चाळणी परीक्षेचा सामाजिक संवर्गनिहाय (OBC,SBC,VJ,NT) निकाल जाहीर करण्यात येत आहे. याबाबत खालील प्रमाणे बाबी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

१. यापूर्वी महाज्योतीचे प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांची नावे निकालातून वगळण्यात आलेली असून त्यांची यादी स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

२. संवर्ग निहाय यादी सारथी संस्थेला पाठवून सारथी संस्थेकडून लाभ घेतलेल्या उमेदवारांची नावे वगळण्यात येतील.

३. उमेदवारांचे लिंग, नाव, प्रवर्ग, दिव्यांग व अनाथ अशा नोंदणी बाबत अर्ज भरतांना चूक झाल्यास विद्यार्थ्यांनी ही बाब तातडीने महाज्योतीच्या निदर्शनास आणून द्यावी.

४. यासह सदर परीक्षेकरिता अर्ज केलेल्या दिव्यांग व अनाथ उमेदवार म्हणून नोंद केलेल्या विद्यार्थ्यांची यादी स्वतंत्रपणे संलग्न करण्यात येत आहे.

५. दिव्यांग उमेदवारांनी त्यांच्या नावापुढे खालील प्रमाणे माहिती नमूद करावी. (संदर्भ : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक–दिव्यांग २०२२/ प्र.क्र.८३/१६ अ दिनांक २९ मे २०१९ नुसार.)

अ) अंध / अल्पदृष्टी

ब) कर्णबधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता

क) अस्थिभंगता/मेंदूचा पक्षघात (Cerebral Palsy)/ कुष्ठरोग मुक्त (Leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायू विकृती (Muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism)/ मंदबुद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Specific learning disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Intellectual Disability) /मानसिक आजार

इ ) वरील दिव्यांग प्रकार (अ) ते (ड) मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी. (उपरोक्त प्रमाणे 'अ' 'ब' 'क' 'ड' अथवा इ अशी नोंद करावी)

६. उमेदवाराने 'अनाथ' नमूद करून अर्ज केला असल्यास आपल्या नावापुढे 'संस्थात्मक' किंवा 'संस्थाबाह्य' अशी नोंद करून प्रमाणपत्र संलग्न करावे. (संस्थात्मक असेल तर 'अ' अथवा संस्थाबाह्य असेल तर 'ब'अशी नोंद करावी)

७. विद्यार्थ्यांकडून माहिती प्राप्त होताच दिव्यांग आणि अनाथ प्रवर्गातून प्रशिक्षणाकरिता निवड झालेल्या उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

८. MPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता खालील प्रमाणे दोन संस्था उपलब्ध आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना संस्था निवडण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी दिनांक ३०/ ११/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध लिंकद्वारे Registered मोबाईल क्रमांक वापरुन login करून संस्थेची निवड करावी.

९. प्रत्येक संस्थेत ५०० विद्यार्थी प्रशिक्षण घेणार आहेत. त्यांनी मागणी केलेल्या प्रशिक्षण संस्थेत संख्याधिक्यामुळे प्रशिक्षण देणे शक्य नसल्यास विद्यार्थ्यांना दुसऱ्या संस्थेला संलग्न करण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांचा विचार केला जाईल.

| अ. क्र. | संस्था | पत्ता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|
| १ | युनिक ॲकडमी पुणे (मराठी माध्यम ) | द युनिक अकॅडेमी, ३९, वास्तु चेंबर्स, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मेन गेट समोर, शिरोळे रोड, शिवाजी नगर, पुणे | ५०० |
| २ | ज्ञानदीप ॲकडमी पुणे (मराठी माध्यम ) | 7 वा मजला, T.C.G. बिल्डिंग, अलका टॉकीज समोर, अलका टॉकीज चौक, टिळक रोड सदाशिव पेठ, पुणे. | ५०० |

जर विद्यार्थ्यांनी त्यांचे लिंग पुरुष ऐवजी स्त्री निवडले असेल व त्यांची निवड महिला संवर्गा मध्ये झालेली असेल तर अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील.

तरी संबंधितांनी उपरोक्त सुचनांची नोंद घ्यावी .

स्वाक्षरीत/-

**(राजेश खवले)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,(महाज्योती), नागपुर**